**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुहास शंकर सावंत
डी, १०१, शिल्पा को.ऑ.हौ.सो.,
एम.आय.टी.(इंजिनिअरिंग)कॉलेजजवळ, पौड रोड कोथरुड, पुणे-३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव, कृषी व प.दु.म.विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव, कृषी व प.दु.म.विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७२ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुहास शंकर सावंत
डी, १०१, शिल्पा को.ऑ.हौ.सो.,
एम.आय.टी.(इंजिनिअरिंग)कॉलेजजवळ,
पौड रोड, कोथरुड, पुणे-३८

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.११.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | सुनावणी नाही. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन १९९० नंतर दुग्धविकास खात्यामधील कर्मचारी-अधिकारी ह्यांची खातेनिहाय चौकशी-निलंबन प्रकरणाबाबत माहिती. तसेच १९९० पूर्वी लावलेली परंतु अद्याप पूर्ण न झालेली प्रकरणे देखील नमूद करुन त्यांची देखील माहिती द्यावी. | |

## विवेचन

दुग्धविकास खात्यामधील कर्मचारी/अधिकारी यांची सन १९९० नंतर झालेली खातेनिहाय चौकशी, निलंबन प्रकरणाबाबतची माहिती व त्यापूर्वीच्या अपूर्ण प्रकरणांची माहिती अपीलकर्ता श्री.सुहास शंकर सावंत यांनी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, कृषी व प.दु.म.विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे मागितली होती. त्यांनी 'महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २०००' असे नमूद करुन हा अर्ज केला होता. हा कायदा निरसित झालेला असून व माहितीचे स्वरुप लक्षात घेता ती उपलब्ध करुन देता येत नाही, असे जन माहिती अधिका-यांना श्री.सावंत यांना कळविले. त्याविरुध्द त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव, कृषी व प.दु.म.विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे केलेल्या अपिलाची दखल घेतली गेली नाही, म्हणून श्री.सावंत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी विधिमंडळ अधिवेशनाच्या कामकाजामुळे व सुनावणीच्या वेळी तयारीसाठी अपुरा वेळ मिळाल्यामुळे व न्यायालयीन प्रकरणातील व्यग्रतेमुळे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित राहू शकत नसल्यामुळे पुढील तारीख मिळण्याची विनंती जन माहिती

अधिकारी तथा  अवर सचिव, कृषी व प.दु.म.विभाग, मंत्रालय, मुंबई श्री.सु.ज.सावितक यांनी केली. श्री.सावंत यांनी, मूळ अर्जास ८६८ दिवस झाले तरी आपल्याला कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे प्रतिपादन करणारे लेखी निवेदन सादर केले.

श्री.सावंत यांनी अशा स्वरुपाचे अपील राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे केले असून तेथील सुनावणीनुसार आपल्या विभागामध्ये कार्यवाही सुरु असून आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास यांच्याकडून माहिती मागविलेली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाला दि.२५.११.२००८ रोजी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले होते. तसेच 'मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे सादर केलेल्या अशाच स्वरुपाच्या अन्य अर्जांवर त्यांनी घेतलेल्या सुनावणीनुसार विभागामध्ये कार्यवाही सुरु असून आयुक्त(दुग्धव्यवसाय विकास) यांच्याकडून माहिती मागविली आहे. ही बाब विचारात घेऊन आणि मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांनी सर्व राज्य माहिती आयुक्त कार्यालयासाठी दि.५ फेब्रुवारी २००७ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, श्री.सावंत यांचा विशेष अपील अर्ज मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे वर्ग केल्यास या विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांच्याकडे सुनावणीस हजर रहाणे सोपे होईल आणि अर्जदारासही आवश्यक माहिती पुरविणे सोईस्कर होईल,' असे श्री.सु.ज.सोवितकर यांनी या निवेदनात म्हटले होते व 'श्री.सावंत यांचा अर्ज मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे हस्तांतरित करण्याची विनंती' केली होती. मात्र संबंधित अपील राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडूनच पुणे खंडपीठाकडे वर्ग करण्यात आले आहे. या अपिलावर पुणे खंडपीठाने कार्यवाही सुरु केलेली असल्यामुळे ही विनंती मान्य करता येत नसल्याचे व पुणे खंडपीठाकडील कार्यवाही चालू राहील, असे आयोगातर्फे त्यांना दि.२१.१.२००९ रोजी कळविण्यात आले.

'दुग्धविकास खात्यामध्ये चुकीच्या-खोट्या खातेनिहाय चौकश्या लावल्या जातात. ज्यांनी गैरव्यवहार केले आहेत, गैरवर्तन केले आहे, त्यांची चौकशी न लावता, आर्थिक हितसंबंधाने प्रकरणे दडपली जातात. क्षुल्लक कारणे दाखवून आर्थिक हेतू साध्य न झाल्यास अशा कर्मचाऱ्यांची / अधिकाऱ्यांची चौकशी लावून, त्यांना त्रास दिला जातो. वर्षानुवर्षे त्यांना मनःस्ताप

देऊन, त्यांना दडपणाखाली ठेऊन वरिष्ठ अधिकारी त्यांचे गैरहेतू साध्य करुन घेत असतात. चौकशी लावणाऱ्या अधिकाऱ्यांना काय व कशाची चौकशी लावली आहे, हे समजतदेखील नाही. अनेक प्रकारामध्ये कर्मचाऱ्यांनी मागितलेले कागदपत्रदेखील दिले जात नाहीत. अशा खोट्या प्रकरणात शासनाचा वेळ व मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च होत आहे,' असे श्री.सावंत यानी मूळ अर्जात व अन्य कागदपत्रांमध्ये म्हटले आहे. अशा प्रकारची विधाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत विचारात घेण्याचे कारण नाही. तसेच सर्वसाधारण, विस्तृत व विशिष्ट तक्त्याच्याच स्वरुपात माहिती मिळण्याची मागणी केली आहे. अशा प्रकारच्या माहितीचे मासिक व त्रैमासिक संकलन दुग्धविकास खात्यामध्ये केले जात असते, असे प्रतिपादन श्री.सावंत यांनी लेखी व तोंडी केले. अशा प्रकारचे संकलन केले जात असल्यास त्याची प्रत अपीलकर्त्यास द्यावयास हवी होती. माहितीची मागणी लक्षात येत नाही, हे जन माहिती अधिकारी यांचे विधान निराधार व चुकीचे आहे. मगणी स्पष्ट आहे. मात्र सन १९९० नंतरच्या सर्व व सन १९९० पूर्वीच्या अपूर्ण राहिलेल्या प्रकरणांची अशा विस्तृत माहिती-मागणीपेक्षा श्री.सावंत यांनी नेमक्या एक वा अधिक प्रकरणाची माहिती मागणे अधिक योग्य ठरले असते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्ता श्री.सुहास शंकर सावंत यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने दुग्धविकास खात्याकडे असलेल्या चौकशी / निलंबनाबाबतच्या माहिती, संकलनाच्या प्रती अथवा अभिलेखाचे अवलोकन करु देऊन नेमक्या मागणीनुसार प्रती त्यांना द्याव्यात. याची पूर्तता १५ दिवसात करुन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाला अहवाल सादर करावा.

(३) माहिती न दिल्याबद्दल शास्ती का करु नये, याचा खुलासा जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, कृषी व प.दु.म.विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसात पुणे खंडपीठाला सादर करावा.

(४) प्रथम अपिलावर कोणतीही कार्यवाही न करणे हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील एतद्‌विषयक तरतुदीचा भंग आहे. तो केल्याबद्दलचा खुलासा अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, कृषी व प.दु.म.विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसात पुणे खंडपीठाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१.४.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.नेमीचंद वालचंद भळगट
४५१ क, बुधवार पेठ, पुणे-२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग(उपआयुक्त कार्यालय क्र.३), पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३२ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००८ |

३. उपस्थित

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रविण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग(उपआयुक्त कार्यालय क्र.३),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.श्याम ढवळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पत्र क्र.७३१४, दि.४.१.२००७ अन्वये ४५१-क बुधवार पेठ, पुणे-२ च मालकांना एकत्र मोजणी करुन क्षेत्र दुरुस्तीचा निर्णय होईपर्यंत काम थांबविणेस कळविण्यात आले होते. सामायिक रसता ५.६ यासह वादातीत क्षेत्र ३० चौ.मी. असताना दि.२५.७.२००७ चे श्री.घाटपांडे यांचे अर्जावर वाटपाबाबत स्पष्ट तफावत दिसत असताना ११.५० चौमी चे हमीपत्र कसे मान्य करण्यात आले व वादातीत जागेचा आपल्या आदेशाप्रमाणे निर्णय झालेला नसताना दि.१.८.२०७ चे आदेशान्वये निर्णय झालेला नसताना दि.४.१.२००७ रोजीचा आदेश बदलणेत आला, याबाबतची माहिती. |

## विवेचन

क्षेत्र दुरुस्ती व मालकी हक्क या अनुषंगाने आपण केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री.नेमीचंद वालचंद भळगट यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण उपविभाग(उपआयुक्त कार्यालय क्र.३), पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे मागितली होती. विषयांकित मिळकतीचा अद्ययावत मोजणी नकाशा व त्यावरील टीपांची छाननी करुन त्वरित अभिप्राय देण्याबाबत नगरभूमापन अधिकारी, पुणे यांना कळविण्यात आले असून हे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग(उपआयुक्त कार्यालय क्र.३), पुणे महानगरपालिका, पुणे यांनी श्री.भळगट यांना कळविले. त्याविरुध्द दाखल केलेल्या प्रथम अपिलाची दखल अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी घेतली नाही, म्हणून श्री.भळगट यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

हा विषय पूर्णत: वैयक्तिक वादाच्या स्वरुपाचा असून श्री.नरेंद्र घाटपांडे, श्री.केतन घाटपांडे व श्री.भळगट यांच्यामधील जागेच्या वादाच्या अनुषंगाने श्री.भळगट लोकशाही दिनासह विविध पातळ्यांवर तो मांडत आले आहेत. श्री.घाटपांडे यांना बांधकामाला दिलेल्या परवानगीला आक्षेप घेऊन श्री.भळगट यांनी क्षेत्रिय दुरुस्तीच्या निर्णयापर्यंत हे बांधकाम करु देऊ नये, अशी मागणी केली, त्या अनुषंगाने न्यायालयीन दावे, प्रतिदावे व अन्य पत्रव्यवहार उभय बाजूंनी केला. आपल्या पत्रावरील कार्यवाहीची माहिती व कागदपत्रांच्या प्रती श्री.भळगट यांनी मागितल्या असून त्यांच्या विविध अर्जांनुसार याबाबतची माहिती व पत्रव्यवहाराच्या प्रती देण्यात आल्या असल्याचे अपिलीय प्राधिकारी श्री.प्रविण गेडाम यांनी नमूद केले. तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी प्रथम अपिलाची दखल न घेण्याबाबतचा खुलासा ते करु शकले नाहीत. मात्र श्री.भळगट यांनी संबंधित मिळकतीच्या मोजणी नकाशाच्या चार वेगवेगळ्या प्रती दाखल केल्या. त्यात तफावत असल्यामुळे व टीपा वेगवेगळ्या असल्यामुळे नगरभूमापन अधिकाऱ्यांकडे अद्ययावत मोजणी नकाशाची व टीपांची छाननी करुन अभिप्राय देण्याची मागणी विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांनी केली आहे. श्री.भळगट यांनी सन १९३४ च्या खरेदीखतानुसार समाईक रस्त्याच्या क्षेत्राबाबत तक्रार केली आहे. त्यांच्या शेजाऱ्यांच्या मिळकतीवरील बांधकामाचा प्रस्ताव महानगरपालिकेने सन २००० चा मोजणी नकाशा ग्राह्य धरुन मान्य केला असल्याचे या पत्रात म्हटले आहे.

श्री.भळगट यांना आवश्यक असलेली माहिती देण्यात आली आहे. मोजणी नकाशातील दुरुस्ती हा विषय माहितीच्या अधिकाराच्या कक्षेतील नाही, मात्र दि.१२.१२.२००७ रोजी नगरभूमापन कार्यालयाकडे पाठविलेल्या पत्रावर नगरभूमापन कार्यालयाने अभिप्राय दिला की नाही व तो काय आहे, हे स्पष्ट झालेले नाही. नगरभूमापन कार्यालयाने संबंधित अभिप्राय बांधकाम नियंत्रण विकास अभियंता, पुणे महानगरपालिका यांना त्वरित सादर करणे व ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी श्री.भळगट यांना देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) नगरभूमापन कार्यालयाने संबंधित अभिप्राय विकास अभियंता(बांधकाम नियंत्रण), पुणे महानगरपालिका यांना त्वरित सादर करावा व जन माहिती अधिकारी यांनी त्याची प्रत श्री.भळगट यांना द्यावी. ही सर्व कार्यवाही पूर्ण करुन विकास अभियंता (बांधकाम नियंत्रण) यांनी आयोगाला दि.५.५.२००९ पर्यंत अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७.४.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.पोपट महादेव राऊत तर्फे ॲड. जयराज रामचंद्र विजापुरे
अे-११, महिन्म सोसायटी, भाग्यश्री बिल्डिंग, कर्वेनगर, पुणे-४११०५२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
नगर अभियंता कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५५ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पोपट महादेव राऊत तर्फे ॲड.जयराज रामचंद्र विजापुरे
अे-११, महिन्म सोसायटी, भाग्यश्री बिल्डिंग, कर्वेनगर, पुणे-४११०५२

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
नगर अभियंता कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे-५ प्रतिनिधी श्री.प्रविण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ प्रतिनिधी श्री.सुकुमार पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.१२.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

अपीलकर्ता यांच्या मिळकतीत श्री.विनोद खानझोडे यांनी प्रपोज्ड बिल्डिंगचा जो प्रस्ताव दाखल केला त्यावर मालकाची सही व संपूर्ण नाव का नाही, याबद्दल खुलासा. सदर जागेमध्ये शॉपिंग सेंटरचे आरक्षण आहे ते गॅझेटमध्ये बदलले आहे का, बदलले असल्यास त्याबद्दलचा आदेश, टिपणी, ओपन स्पेस, त्योच क्षेत्रफळ द्यावे, दि.५.६.१९९७ रोजीच्या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये शॉपिंग सेंटरचे आरक्षण ठेवलेले आहे, त्यामध्ये अ व ब ची १५ टक्के पूर्तता कशासाठी आहे, खुलासा, तसेच शॉपिंग सेंटरच्या बांधकामाऐवजी ऑफिस दाखविले आहे, खुलासा, परिशिष्ट-अ मधील क्र.६ बाबत विकसनाच्या कामाच माहिती व तपशील या फॉर्ममध्ये १०-अ अस्तित्वात असलेले बांधकाम निल दाखविलेले आहे त्याबद्दल खुलासा. अपीलकर्ता यांचे गौरव चिकन सेंटरचे जुने बांधकाम स.नं.८८/५ब/२अ/१ यामध्ये का दाखविले नाही, सत्यप्रती द्याव्यात.

## विवेचन

नियोजित इमारतीबाबत दाखल केलेल्या प्लॅनमध्ये बदल केला ही माहिती चुकीची असल्याच्या मुद्दयावरुन अपीलकर्ता श्री.पोपट महादेव राऊत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

कोथरुडमधील स.नं.८८/५ब/२अ/१ या मिळकतीमध्ये इमारत बांधकामाचा प्रस्ताव दाखल करण्यात आला असून शॉपिंग सेंटरसाठी आरक्षणाला मान्यता दिलेली होती. तसेच व्यापारी

गाळ्याऐवजी १५ टक्के क्षेत्राचे बांधकाम विकसकाने महानगरपालिकेला द्यावयाचे आहे. व्यापारी गाळ्याच्या ऐवजी कार्यालये कशी दाखवित येतात, याचे उत्तर 'आर-७ प्रमाणे प्लॅनमध्ये बदल केलेला आहे,' असे देण्यात आले. बांधकाम नियमावली आर-७ प्रमाणे असे बदल करता येत नाहीत, म्हणून दिलेली माहिती चुकीची आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.पोपट महादेव राऊत यांच्यातर्फे ॲड.जयराम रामचंद्र विजापुरे यांनी लेखी व तोंडी केले. आपल्याला अर्धवट माहिती दिली. आपल्या पत्रातील चार मुद्दयांबाबत बांधकाम नियंत्रण विभागामार्फत माहिती देण्यात येणार आहे, असे कळविले. अपीलकर्ता श्री.राऊत यांच्या दुकानाचे जुने बांधकाम व विकसनाच्या कामाच्या माहितीबाबतचा तपशील या विषयाचा खुलासा मालक व विकसक यांच्याकडून मागविला असल्याचे जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता यांनी कळविले. प्रथम अपिलाच्या सुनावणीमध्ये फाईल दाखवून कागदपत्रे देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुण महानगरपालिका यांनी दिला होता. त्याच्याही प्रती मिळाल्या नाहीत, असे प्रतिपादन ॲड.विजापुरे यांनी केले.

श्री.राऊत यांचा मूळ अर्ज दि.११.९.२००७ चा असून जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.२७.९.२००७ व दि.११.१०.२००७ रोजी उत्तर दिले. कागदपत्रे उपलब्ध न होण्याचे कारण नमूद केले, मात्र जतनाच्या कालावधीतील कागदपत्रे उपलब्ध नसल्यास संबंधित जबाबदार कर्मचाऱ्यावर कारवाई करणे आवश्यक असून महानगरपालिकेने तसे केलेले दिसत नाही.

प्लॅनमध्ये केलेल्या बदलाची माहिती श्री.राऊत यांना देण्यात आली होती व ॲड.विजापुरे यांनी ते मान्य केले, असे अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता यांच्या दि.२०.१२.२००७च्या निकालपत्रात नमूद केले आहे. मूळ अर्जाव्यतिरिक्तची काही माहिती अपीलकर्त्याने मागितली. परंतु विषयाची संपूर्ण फाईल त्यांना दाखवून उपलब्ध कागदपत्राच्या प्रती द्याव्यात, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशात नमूद केले आहे. मात्र मूळ अर्जाव्यतिरिक्तची ही मागणी आहे. मंजूर प्लॅनमध्ये केलेला बदल कायदेशीर की बेकायदेशीर, हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही. त्यामुळे प्लॅनमध्ये बदल केला, असे सांगणे या प्रशासकीय कार्यवाहीबद्दल

दुमत असू शकेल, परंतु ती 'माहिती' चुकीची ठरत नाही. तसेच खुलासा, स्पष्टीकरण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागता येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७.४.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.महेश बाबुराव काळे
१४५०, कसबा पेठ, पुणे-११ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६६ / पुणे / २०० |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महेश बाबुराव काळे
१४५०, कसबा पेठ, पुणे-११

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ प्रतिनिधी श्री.प्रविण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.श्याम ढवळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.१.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>घर क्र.१४५०, कसबा पेठ ही इमारत धोकायदायक ठरविलेली आहे. याबाबतीत भाडेकरु, घरमालक यांच्याशी केलेला पत्रव्यवहार, घेतलेले जबाब व तत्संबंधीची (आदेश, नकाशा, सर्वेक्षणाची प्रत इ.) सर्व कागदपत्रे, प्रगती कन्स्ट्रक्शन यांनी दरवाजा बसविण्यास दाखल केलेल्या प्रस्तावाची प्रत, हे काम प्रस्तावाप्रमाणे झाले किंवा नाही हे पाहणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा | |

## विवेचन

धोकादायक ठरलेल्या इमारतीबाबतची सन १९९२ पासूनची माहिती अपीलकर्ता श्री.महेश बाबुराव काळे यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे मागितली होती. उत्तर विलंबाने दिले, तारखा चुकीच्या दाखविल्या व इमारतीचे सर्वेक्षण झालेले नसताना झाल्याचे खोटे नमूद केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी या बाबींची दखल घेतली नाही, या कारणावरुन श्री.काळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

घर क्र.१४५०, कसबा पेठ,पुणे या इमारतीबाबत श्री.काळे यांनी मागितलेली सर्व माहिती त्यांना देण्यात आली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी निकालपत्रात नमूद केले आहे. तसेच उशिरा माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी व संबंधित अधिकारी यांना त्यांनी सक्त ताकीद दिली असून 'पुन्हा कसूर झाल्यास कडक कारवाई ' करण्याचा इशारा दिला आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.श्याम ढवळे यांनी नमूद केले. आपण दि.२९.८.२००७ रोजी मूळ अर्ज केला असताना जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याच्या पत्रात अर्ज दि.३.९.२००७ चा असल्याचे नमूद केले. माहिती

पाठविल्याच्या पत्रावर दि.९.१०.२००७ अशी तारीख नमूद आहे. परंतु अधिकाऱ्यांनी सह्या दि.१०.१०.२००७ रोजी केल्या आहेत व हे पत्र आपल्याला दि.१८.१०.२००७ ला मिळाले. तारखांबाबत बनवाबनवी केली असल्याचे यावरुन दिसते. इमारतीचे सर्वेक्षण झालेले नसतानाही सर्वेक्षण झाल्याची खोटी माहिती दिली, असे प्रतिपादन श्री.काळे यांनी केले. खात्याअंतर्गत अधिकाऱ्याकडे हे काम दिलेले होते. त्यामध्ये विविध विभागाचा संबंध येतो असे जन माहिती अधिकारी श्री.श्याम ढवळे यांनी सांगितले. सर्वेक्षण झाले असल्याची माहिती योग्य आहे. त्याचा अहवाल नसला तरी त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध आहे, असे अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.प्रविण गेडाम यांनी नमूद केले.

उत्तराला झालेला विलंब, तारखांबाबतची विसंगती व सर्वेक्षणाबाबतची वस्तुस्थिती या तीनही विषयांबाबत संबंधितांच्या लेखी खुलाशासह निवेदन सादर करण्याचा तोंडी आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. खुलासा समाधानकारक नसल्यास संबंधितांना शास्ती होऊ शकते, याची जाणीवही आयोगाने दिली.

उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.३, पुणे महानगरपालिका यांनी दि.१.१०.२००८ रोजी संबंधितांच्या खुलाशासह निवेदन आयोगाला सादर केले. नगर उपअभियंता(बांधकाम नियंत्रण), पुणे महानगरपालिका यांचा खुलासा त्यांनी दि.२२.८.२००८ च्या पत्रान्वये मागितला होता. संबंधित अर्जाच्या काळात बांधकाम नियंत्रण कार्यालय मुख्य इमारतीमधून टिळक रोड क्षेत्रिय कार्यालयात हलविण्यात आले होते. काही अधिकारी मुख्य इमारतीत व काही अधिकारी स्थलांतरित कार्यालयात अशी व्यवस्था त्यावेळी होती. मागितलेली माहिती जवळजवळ १५ वर्षांच्या काळातील होती. त्यामुळे ती देण्यास विलंब झाला. श्री.काळे यांचा अर्ज दि.९.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांना प्राप्त झाला. पत्र तयार केल्याच्या दुसऱ्या दिवशी अधिकाऱ्याच्या सह्या घेतल्याचे व कनिष्ठ अभियंत्याच्या सह्यानंतर जावक क्रमांक टाकून ऊर्वरित अधिकाऱ्यांच्या सह्या दुसऱ्या दिवशी घेतल्याचे निदर्शनास येत आहे. उत्तराच्या पत्रावर दि.९.१०.२००७ व अधिकाऱ्यांची सही दि.१०.१०.२००७ त्यामुळे असा नजरचुकीने राहिलेला हा दोष आहे, असे संबंधितांनी केलेल्या

खुलाशामधून दिसून येते, असे उपायुक्त, विभागीय कार्यालय क्र.३, पुणे महानगरपालिका यांनी नमूद केले आहे. वरील बाबी पाहता दिलेली माहिती, विलंबाबाबतचे स्पष्टीकरण व तारखातील विसंगतीबाबतचा खुलासा योग्य आहे. त्यामुळे शास्ती लावण्यात येत नाही.

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२२.४.२००९**